संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# महाराष्ट्र नावाच्या कोहिनूरी हिऱ्याचे गौरव वर्ष

**राजकारण्यांना** किंवा सत्ताधाऱ्यांना निवडणुकीच्या धामधुमीत महाराष्ट्राचाही विसर पडलेला दिसतो. १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. स्वतंत्र मराठी राज्य म्हणून महाराष्ट्राचा मंगल कलश याच वर्षी यशवंतराव चव्हाणांनी आणला असे आजही गौरवाने सांगितले जाते. तोच महाराष्ट्र आज बरोबर साठ वर्षांचा होत आहे. मनुष्याच्या जीवनामध्ये वयाची साठ वर्षे ही किती मोलाची असतात हे आपणा सगळ्यांना माहिती आहे. परंतु संस्था एखादे राज्य किंवा देशाच्या जीवनात येणारी ही साठ वर्षाची संधी म्हणजे परिपक्वता आणि प्रगल्भतेची नांदी मानली जाते. महाराष्ट्राच्या स्थापनेला पन्नास वर्षे झाली त्यावेळी सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून बरेच मोठे कार्यक्रम झाले. साठ वर्षे पूर्ण होत असताना या हिरक महोत्सवाचेही राज्यकर्त्यांना आणि तितकेच मराठी माणसांना स्मरण राहिलेले दिसत नाही. आजपासून सुरू झालेले हे हिरक महोत्सवी वर्ष खरोखरच महाराष्ट्र नावाच्या कोहिनूर हिऱ्याचा गौरव करणारे आहे. मुंबई महाराष्ट्रापासून तोडायची आणि गुजरातला जोडायची असा राजकीय घाट दिल्लीत घातला गेला होता. म्हणजे महाराष्ट्राची मान पिरगाळून एकूणच मराठीचा बळी घेण्याचा तो कुटील डाव मराठी मनगटाने यशस्वी होऊ दिला नाही. अन्यायाच्या भट्टीतून तावून सुलाखून आजचा हा महाराष्ट्र घडलेला आहे. अशा या महाराष्ट्राला वर्धापन दिनानिमित्त अभिवादन करीत असताना ज्या १०५ हुतात्म्यांनी त्यासाठी रक्त सांडले त्यांचेही यावेळी तितक्याच कृतज्ञतेने स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. महाराष्ट्राच्या निर्मितीत शौर्य आणि सौजन्य दाखवणाऱ्या किंवा अस्सल मराठीपणाचा सिंहाचा वाटा आहे हे विसरता कामा नये. अनेक अभ्यासकांनी, साहित्यिकांनी महाराष्ट्राचे वर्णन करताना त्याच मराठी उदारतेचा आणि सौजन्यतेचा आपल्या लेखणीतून मनसोक्त आनंद घेतलेला दिसून येतो.

### एकेकाळचा संपन्न महाराष्ट्र

दगडांच्या देशा राकट देशा हे तर त्याचे आपण नेहमीच ऐकत आलेले वर्णन आहे. परंतु अगदी १९५०-५५ च्या सुमारास नारायण नांदापूरकर या लेखकांनी महाराष्ट्राचे वर्णन करतानाच सगळ्याच देशाला प्रेम आणि सौजन्य देणारा प्रदेश म्हणून देवाने महाराष्ट्राचा पाळणा केला असा उल्लेख वाचायला मिळतो. त्याचे वर्णन करताना ते म्हणतात की, महाराष्ट्राच्या या पाळण्याला प्रत्यक्ष देवानेच आपल्या कृपेचा चांदवा केला. त्याला सह्याद्री आणि सातपुड्यांची खेळणी लटकवली त्यां चांदव्याची भोवती वनश्रीची झालर लावली. कृष्णा, गोदा यांचा गोफ विणून त्याची पाळणा हलवण्यासाठी दोरी केली. इकडून मातापूरनिवासिनी रेणुका आली. तिकडून तुळजापूरची आई भवानी आली. त्यांनी पाळणा म्हटला साधुसंतांनी तिचे नावमराठी असे ठेवले. आणि हीच तुमची आमची मायमराठी आज खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची साठी ओलांडते आहे. तेव्हा तिचा तितकाच सार्थ गौरव तिच्या बाळांनी केला पाहिजे. किंबहुना त्या गौरवाचे महाराष्ट्रगीत नव्याने लिहीले पाहिजे. देशाला ऐकवले गेले पाहिजे. छत्रपती शिवाजींच्या शौर्याचा पोवाडा गाणारा महाराष्ट्र सर्वांना सामावून घेणारे सौजन्य जेव्हा दाखवतो तेव्हा तो खऱ्या अर्थाने राष्ट्राला जोडलेल्या महा या शब्दात दडलेले मन्वंतरही स्पष्ट करीत असतो. प्राचीन काळी हा महाराष्ट्र अतिशय सुखी आणि संपन्न असल्याचा उल्लेखही अनेक ठिकाणी वाचायला मिळतो. बाबासाहेब पुरंदरेंनी एका ठिकाणी असं वर्णन केले होते की या महाराष्ट्रातली खेडीपाडी आनंदात होती. भीमा, पूर्णा, तापी , कृष्णा सुप्रसन्न वाहात होत्या. घराघरातले नंदादीप प्रशांत तेवत होते. ओसरी ओसरीवरचे झोपाळे मुलीबाळींनी गजबजून ओव्या गात होते. उखळ्या जात्यांचे गळे धान्याने दाटून येत होते. महाराष्ट्राला दुष्काळ ठाऊकच नव्हता. दूध, दुभते विकायची आणि विकत घ्यायची गरजच पडत नव्हती. सांज सकाळी तुळशीपाशी दिवे लागत होते. गोग्रास घातल्याशिवाय गृहिणी जेवत नव्हत्या. नद्यांच्या घाटावर धूणी धुता धुता स्त्रीयांच्या हातातील सोने जायफळासारखे झिजावे अशी इथे संपन्नता होती. महाराष्ट्रावर लक्ष्मी प्रसन्न होती. आणि महाराष्ट्रावर शक्तीही प्रसन्न होती. सरस्वतीनेसुध्दा हातांची ओंजळ रीती केली होती अशी संपन्नता लाभलेला हा माझा महाराष्ट्र त्या अनुभवाचा पुनर्प्रत्यय देणारा व्हावा असे सारखे वाटत राहाते.

### महाराष्ट्राचे मर्म

आज ती परिस्थिती नाही याचे शल्य तितक्याच तीव्रपणे जाणवते. निम्मा महाराष्ट्र आज दुष्काळाच्या वणव्यात होरपळतो आहे. नद्या, जलसाठे लुप्त होत आहेत. जवळपास सगळ्याच गोष्टींसाठी महाराष्ट्राला दिल्लीवर अवलंबून राहावे लागते. मग अगदी सुरक्षिततेपासून ते महाराष्ट्रातून सर्वाधिक गोळा होणारा कर दिल्लीच्या उंबऱ्यावर ओतण्यापर्यंत हे परावलंबित्व तीव्रपणे जाणवते. ज्या महाराजांनी हिंदवी स्वराज्याची गर्जना वास्तवात आणली तो महाराष्ट्र आज कोणत्याच बाबतीत स्वयंपूर्ण नाही निदान हे शल्य तरी या हिरक महोत्सवी वर्षात नाहीसे करण्याची जिद्द दाखवली गेली पाहिजे. गावात आणि खेड्यापाड्यात विकासाच्या मूलभूत सोयी पोहचल्या पाहिजेत. किंबहुना संपन्नता म्हणजे काय याची नवी व्याख्या अधोरेखित करून महाराष्ट्राने स्वयंपूर्णतेची जिद्द दाखवली पाहिजे. साठ वर्षापूर्वी आणलेल्या त्या मंगल कलशाचे पुन्हा एकदा सुमंगल केले पाहिजे आणि स्वयंपूर्णतेचे स्वाभिमानाचे तोरण बांधून एकेकाळी देवगिरीच्या चंद्रवंशी राजांनी निर्माण केलेल्या वैभवावर कळस चढवला पाहिजे आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वाभिमानी महाराष्ट्राचे दर्शन घडवले पाहिजे यासाठी राज्यकर्ते काही करतील ना करतील. परंतु मराठी माणसाने या पूर्ण वर्षभरात गावोगावी खेडोपाडी महाराष्ट्राच्या स्थापनेचा इतिहास सांगणारे महोत्सव भरवावेत. मराठी इतिहास, हाच मराठी माणसाच्या भविष्याचा ध्यास आहे इतकी उत्कटता त्यातून व्यक्त व्हायला हवी. आम्ही बोलतो मराठी, चालतो मराठी असे म्हणत असताना प्रत्येक कृतीतून त्या महाराष्ट्राचा जर जयजयकार घडून आला तर नव्या पिढीने महाराष्ट्राचे मर्म ओळखले असे म्हणता येईल.